दिव्य मराठी

यवतमाळ, बुधवार, १२ जून २०२४ | ४

# हनुमान व्यायामशाळा क्रीडा प्रसारक मंडळात पर्यावरणदिन

प्रतिनिधी | यवतमाळ

हनुमान व्यायामशाळा स्पोर्ट्स क्लब फिजिकल शिक्षण महाविद्यालय लोहाराच्या वतीने जागतिक पर्यावरणदिनी वृक्षारोपण आणि वृक्ष दिंडी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. महाविद्यालयातील विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत बुधवारी वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वीरेंद्र तलरेजा यांच्या हस्ते महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी विद्यार्थी प्रतिनिधींनी वृक्षारोपण करण्यात आले. यानंतर पर्यावरण जागृतीसाठी वृक्ष दिंडी काढण्यात आली. यावेळी ठिकठिकाणी दिंडीचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाला डॉ. सुहास तिवळकर, डॉ. अजय कोलारकर, प्रा. अभय भीष्म, प्रा. प्रेमेंद्र रामपूरकर, रवींद्र निमट, विनोद डगवार, सुनील काळे, धनराज यंबावले, राजेश अलोणे, विकास चिचोळकर यांच्यासह बीपीएड, एमपीएड आणि बीपीईएसचे विद्यार्थी उपस्थित होते.

---

हॅलो यवतमाळ

epaper.lokmat.com
बुधवार, दि. ११ जानेवारी २०२३ | 3

# केवळ बीपीएड करून थांबू नका

## अरविंद साजवान : शारीरिक शिक्षण महाविद्यालयात मार्गदर्शन







लोकमत न्यूज नेटवर्क
यवतमाळ : शारीरिक शिक्षण क्षेत्रात प्रगतीच्या खूप संधी आहेत. केवळ बीपीएड करून थांबू नका; तर या क्षेत्रात अधिकाधिक प्रगती करा, असे प्रोत्साहनपर मार्गदर्शन लक्ष्मीबाई नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फिजिकल असोसिएशनचे निवृत्त प्राध्यापक तथा स्पोर्ट्स सायन्सचे डीन व माजी रजिस्ट्रार डॉ. अरविंद एस. साजवान यांनी केले.

हनुमान व्यायामशाळा क्रीडा मंडळ शारीरिक शिक्षण महाविद्यालयाला डॉ. साजवान यांनी भेट दिली. यावेळी ते बोलत होते. महाविद्यालयाची बीपीएसई, बीपीएड व एमपीएड शाखेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी विविध अभ्यासक्रमाविषयीसुद्धा सांगितले. नॅक कमिटीसंदर्भातही विविध प्रकारची माहितीही त्यांनी दिली. संपूर्ण महाविद्यालयाची माहिती घेतानाच त्यांनी इनडोअर स्टेडियममधील बॅडमिंटन कोर्ट व इतर सोयीसुविधांविषयीसुद्धा कौतुक केले.

### विविध देशांत रिसर्च पेपर प्रसिद्ध

डॉ. अरविंद साजवान यांना शारीरिक शिक्षण क्षेत्राचा ३५ वर्षांचा अनुभव आहे. विविध पदावर त्यांनी कार्य केले. त्यांचे तीन इंटरनॅशनल, चार नॅशनल बुक्स प्रकाशित झाले आहेत. स्पेन, जर्मनी, कॅनडा, तुर्की, ब्राझील, यूएसए या देशांमध्ये त्यांचे रिसर्च पेपर व आर्टिकल प्रसिद्ध झाले आहेत.

यावेळी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वीरेंद्र तलरेजा, एमपीएड विभाग प्रमुख डॉ. सुहास तिवळकर, बीपीएसई विभागप्रमुख प्रा. अभय भिष्म, बीपीएड विभाग प्रमुख प्रा. प्रेमेंद्र रामपूरकर, तसेच डॉ. अजय कोलारकर उपस्थित होते. संचालन व परिचय प्रा. अभय भीष्म यांनी केले. आभार प्राचार्य वीरेंद्र तलरेजा यांनी मानले.

Co.ordinator
IQAC
HVSKM Phy.Edu.College
Yavatmal

Chairperson
IQAC
HVSKM Phy.Edu.College
Yavatmal



हनुमान व्यायाम शाळा क्रीडा मंडळाच्यावतीने मंडळाचे सदस्य तथा गुणवंत खेळाडू दामू सातारकर, मयुरी सोनवणे, पूजा मोहोड यांचा मंडळाचे अध्यक्ष विजय दर्डा यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला, सोबत किशोर दर्डा.

# हनुमान व्यायाम शाळा क्रीडा मंडळातर्फे गौरव

## विजय दर्डा : दर्जेदार खेळाडू घडविण्यासाठी स्पर्धांचे नियोजन करा

लोकमत न्यूज नेटवर्क

**यवतमाळ :** हनुमान व्यायाम शाळा क्रीडा मंडळातर्फे राष्ट्रीय क्रीडारत्न समता पुरस्कार मिळाल्याबद्दल दामू सातारकर, ६७ वी वरिष्ठ राष्ट्रीय कबड्डी चॅम्पियनशीप खेळल्याबद्दल मयुरी सोनवणे आणि महाराष्ट्र पोलीस दलात निवड झालेली पूजा मोहोड या गुणवंत खेळाडूंचा हनुमान व्यायाम शाळा क्रीडा मंडळाचे अध्यक्ष माजी खासदार विजय दर्डा यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

सोमवारी येथील हनुमान व्यायाम शाळा क्रीडा मंडळ शारीरिक शिक्षण महाविद्यालयात मंडळाची ४३ वी वार्षिक आमसभा पार पडली. विजय दर्डा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेला व्यवस्थापकीय विश्वस्त किशोर दर्डा, उपाध्यक्ष प्रताप पारसकर यांच्यासह व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष बाळासाहेब मांगुळकर, व्यवस्थापन समिती सचिव विजयराव देशमुख, विश्वस्त आनंदराव गावंडे, व्यवस्थापन समिती सदस्य प्रकाश चोपडा, प्राचार्य डॉ. वीरेंद्र तलरेजा, विलास देशपांडे, सुभाष यादव आदींसह मंडळ सदस्यांची उपस्थिती होती. मंडळाचे अध्यक्ष विजय दर्डा यांनी मार्गदर्शन केले.

मंडळाचे अद्ययावत तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्वातंत्र्य संग्राम सेनानी जवाहरलाल दर्डा इनडोअर स्टेडियम असून येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे बॅडमिंटन कोर्टही आहे. त्यामुळे येथे विविध स्तरावरील स्पर्धा आयोजित करण्याची गरज असून याद्वारे क्रीडा संस्कृती आणखी समृद्ध होईल, तसेच दर्जेदार नवे खेळाडू घडण्यासाठी मदत होईल, असे विजय दर्डा यांनी सांगितले.

सूत्रसंचालन व आभार डॉ. अजय कोलारकर यांनी केले. कबड्डी प्रशिक्षक विशाल आकोलकर उपस्थित होते.

Co.ordinator
IQAC
HVSKM Phy.Edu.College
Yavatmal

Chairperson
IQAC
HVSKM Phy.Edu.College
Yavatmal

# ENVIRONMENT DAY

## हनुमान व्यायामशाळा क्रीडा प्रसारक मंडळात पर्यावरण दिवस उत्साहात



लोकमत न्यूज नेटवर्क

यवतमाळ : स्थानिक हनुमान व्यायामशाळा क्रीडा मंडळ शारीरिक शिक्षण महाविद्यालय लोहाराच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनी वृक्षारोपण आणि वृक्ष दिंडी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत बुधवारी वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वीरेंद्र तलरेजा यांच्या हस्ते महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी विद्यार्थी प्रतिनिधींनी वृक्षारोपण करण्यात आले. यानंतर पर्यावरण




जागृतीसाठी वृक्ष दिंडी काढण्यात आली. यावेळी ठिकठिकाणी दिंडीचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाला डॉ. सुहास तिवळकर, डॉ. अजय कोलारकर, प्रा. अभय भीष्म, प्रा. प्रेमेंद्र रामपूरकर, रवींद्र निमट, विनोद डगवार, सुनील काळे, धनराज बंबावले, राजेश अलोणे, विकास चिंचोळकर यांच्यासह बीपीएड, एमपीएड आणि बीपीईएसचे विद्यार्थी उपस्थित होते

Co.ordinator
IQAC
HVSKM Phy.Edu.College
Yavatmal

Chairperson
IQAC
HVSKM Phy.Edu.College
Yavatmal

## PREPARATION OF NAAC NEWS PAPER CUTING

शारीरिक शिक्षण महाविद्यालयात कार्यशाळा

# 'नॅक'ची माहिती भरण्याच्या दिल्या टिप्स

लोकमत न्यूज नेटवर्क



**यवतमाळ :** हनुमान व्यायामशाळा क्रीडा मंडळद्वारा संचालित येथील शारीरिक शिक्षण महाविद्यालयात 'नॅशनल असेसमेंट अँड ॲक्रिडिटेशन कौन्सिल'वर आधारित कार्यशाळा नुकतीच पार पडली. प्रमुख मार्गदर्शक म्हणून अमरावती येथील शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे, प्रा.डॉ. राजेश दास, प्रा. सचिन महल्ले, प्रा. सुशांत कुकडे आदी लाभले होते.

उद्घाटनप्रसंगी मंचावर प्राचार्य डॉ. वीरेंद्र तलरेजा आदी उपस्थित होते. कार्यशाळेच्या प्रथम सत्रात नॅक संदर्भातील एकूण विभाग, त्या विभागाची माहिती कशा पद्धतीने भरायची, अपलोड करायची याविषयीचे मार्गदर्शन डॉ. अंजली ठाकरे यांनी केले.

दुसऱ्या सत्रात विभागवार माहिती कशा पद्धतीने भरायची आहे हे एलसीडी प्रोजेक्टरच्या माध्यमातून सविस्तरपणे विषद करण्यात आले. याच सत्रात चर्चासत्रही घेण्यात आले. डॉ. राजेश दास, डॉ. सचिन महल्ले, प्रा. सुशांत कुकडे यांनी मार्गदर्शन केले.

या दोनही सत्राचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. अजय कोलारकर यांनी केले. प्रथम सत्रात आभार प्रदर्शन प्रा.डॉ. सुहास तिवळकर, तर द्वितीय सत्रात प्रा. प्रेमें रामपुरकर यांनी केले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी नॅक कमिटी प्रमुख प्रा. अभय भीष्म, ग्रंथपाल रवींद्र निम[illegible] विजय वाघ, हरीष टांक, विनोद डग[illegible] सुनील काळे, राजेश अलोणे, विक[illegible] चिंचोळकर आदींनी पुढाकार घेतला.

# शारीरिक शिक्षा महाविद्यालय में कार्यशाला

लोकमत समाचार सेवा



कार्यशाला में उपस्थित अतिथि तथा महाविद्यालय के प्राचार्य व प्राध्यापक.

**यवतमाल :** यहां हनुमान व्यायाम शाला प्रसारक मंडल द्वारा संचालित शारीरिक शिक्षा कॉलेज में हाल ही में राष्ट्रीय मूल्यांकन और प्रत्यायन परिषद पर आधारित एक कार्यशाला आयोजित की गई. इस अवसर पर मुख्य मार्गदर्शक के रूप में शिवाजी कॉलेज ऑफ फिजिकल एजुकेशन, अमरावती की प्राचार्य प्रा. अंजलि ठाकरे, प्रा. डॉ. राजेश दास, प्रा. सचिन महल्ले, प्रो. सुशांत कुकड़े आदि उपस्थित थे.

इसके उद्घाटन पर महाविद्यालय के प्राचार्य डॉ. वीरेंद्र तलरेजा-तथा अन्य प्राध्यापक मौजूद थे. कार्यशाला के प्रथम सत्र में एनएएसी से संबंधित संपूर्ण अनुभाग को भरने व अपलोड करने की जानकारी डॉ. अंजलि ठाकरे ने दी. दूसरे सत्र में एलसीडी प्रोजेक्टर के माध्यम से विभाग के अनुसार जानकारी भरने के बारे में बताया गया. इस दौरान एक सेमिनार भी आयोजित किया गया. इस सत्र में डॉ. राजेश दास, डॉ. सचिन महल्ले, प्रा. सुशांत कुकड़े ने मार्गदर्शन किया. इन दोनों सत्रों का संचालन प्रा. डॉ. अजय कोलारकर ने किया. प्रथम सत्र में प्रो. डॉ. सुहास तिवलकर, जबकि दूसरे सत्र में प्रेमेंद्र रामपुरकर ने आभार प्रदर्शन किया. परिषद की सफलता के लिए नैक समिति प्रमुख प्रो. अभय भीष्म, ग्रंथपाल रवींद्र निमत, विजय वाघ, हरीश टांक, विनोद दगवार, सुनील काले, राजेश अलोन, विकास चिचोलकर आदि ने प्रयास किया.

Co.ordinator
IQAC
HVSKM Phy.Edu.College
Yavatmal

Chairperson
IQAC
HVSKM Phy.Edu.College
Yavatmal

## PAPER CUTING OF PLANTATION PROGRAM

# शारीरिक शिक्षण महाविद्यालयात वृक्षारोपण



लोकमत न्यूज नेटवर्क

यवतमाळ : ज्येष्ठ स्वातंत्र्यसंग्राम सेनानी, लोकमत समूहाचे संस्थापक संपादक जवाहरलाल दर्डा उपाख्य बाबूजी यांच्या जयंतीनिमित्त येथील हनुमान व्यायाम शाळा क्रीडा मंडळ शारीरिक शिक्षण महाविद्यालयात वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. वीरेंद्र तलरेजा होते.

प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक सागर भास्करवार, दूरसंचार विभागाचे अभियंता शेखूवाले, विद्युत कंपनीचे निवृत्त अभियंता अनिल अंबाडकर आदी उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी समयोचित मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. अजय कोलारकर यांनी केले. आभार प्रा. अभय भिषा यांनी मानले. कार्यक्रमाला प्रा. डॉ. सुहास तिवळकर, प्रा. प्रेमेंद्र रामपूरकर, रवींद्र निमट, विजय वाघ, सुनील काळे, विनोद डगवार, विकास चिंचोळकर, राजू अलोणे, धनराज बंबावले यांच्यासह बॅडमिंटन स्टेडियमवर खेळणारे खेळाडू उपस्थित होते. आयोजनासाठी शिक्षक, कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला.

# भावी शिक्षकांकडून 'ग्रीन इव्हेन्यू'चा निर्धार

## खा. विजय दर्डा आणि किशोर प्रधान यांच्या उपस्थितीत एक हजार वृक्षारोपणाचा शुभारंभ





वृक्षारोपण करताना किशोर प्रधान.



वृक्षारोपण करताना खा. विजय दर्डा.

Co.ordinator
IQAC
HVSKM Phy.Edu.College
Yavatmal

Chairperson
IQAC
HVSKM Phy.Edu.College
Yavatmal

# शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या बीपीएडचे विद्यार्थी गुणवत्ता यादीत

लोकमत न्यूज नेटवर्क

यवतमाळ : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या उन्हाळी २०२० च्या परीक्षेत हनुमान व्यायामशाळा क्रीडा मंडळ शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या बीपीएडचे दहा विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले आहेत. यासोबतच, या महाविद्यालयाची मेरीटची परंपरा कायम राहिली आहे.

बीपीएडमध्ये राधिका खत्री गुणवत्ता यादीत पहिली आली आहे. हरी मोहनसिंग नेगी दुसरा, मनोजकुमार राणा चौथा आला; नीरजकुमार सिंग महेशप्रसाद सिंग, नीरजकुमार सतीश शर्मा, हरिओम सेन हे तिघे गुणवत्ता यादीत सहावे आले आहेत. मनाली कुमारी आठवी, एम. डी. जावेद नववा आला. एम. डी. सद्दाम व मोहम्मद नईम यांनी दहावे स्थान प्राप्त केले आहे.

संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष किशोर दर्डा यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. वीरेंद्र तलरेजा, एमपीएड विभाग प्रमुख डॉ. सुहास तिवळकर, बीपीएड विभाग प्रमुख प्रा. प्रेमेंद्र रामपूरकर, बीपीई विभाग प्रमुख प्रा. अभय भीष्म, डॉ. अजय कोलारकर, ग्रंथपाल रवींद्र निमट आदींचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

महाविद्यालयाचे शिक्षकेतर कर्मचारी विनोद डगवार, विजय वाघ, सुनील काळे, धनराज बंबावले, राजू अलोणे, विकास चिंचोळकर यांनीही गुणवंतांचे कौतुक केले.


राधिका खत्री


हरी मोहनसिंग नेगी


मनोजकुमार राणा


नीरजकुमार सिंग


नीरजकुमार शर्मा


हिरओम सेन


मनाली कुमारी


एम.डी. जावेद


एम.डी. सद्दाम


मोहम्मद नईम

Co.ordinator
IQAC
HVSKM Phy.Edu.College
Yavatmal

Chairperson
IQAC
HVSKM Phy.Edu.College
Yavatmal